दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -३२९ | शनिवार ०२ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-329 | Saturday, Dt.02 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# अन्यथा बीड जिल्हा बंद, मनोज जरांगेंचा इशारा

## महादेव मुंडे खून प्रकरण! आठ दिवसात आरोपींना अटक करा

बीड - पुढील आठ दिवसात महादेव मुंडे खून प्रकरणातील आरोपी अटक करा नाहीतर बीड जिल्ह्यात कडकडीत बंद करण्यात येणार असल्याचा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात मुंडे कुटुंबाला न्याय मिळण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आज व्यापक बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत महादेव मुंडे यांचे कुटुंब, सरपंच देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुंडे कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत लढा सुरू राहणार, बैठकीत निर्णय

या बैठकीतून मनोज जरांगे पाटलांनी थेट धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला. आमचे वैर मुंडे बहीण भावाशी नाही. पुढील आठ दिवसात मुंडे हत्या प्रकरणात आरोपी अटक झाले नाही. तर बीड जिल्हा कडकडीत बंद राहील असा निर्णय घेण्यात आला. जरांगे पाटील यांचे भाषण सुरू असताना मुंडे कुटुंब हुंदके देत रडू लागले. मुंडे कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत लढा सुरू राहील असा निर्धार या बैठकीतून करण्यात आला. २९ ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणासाठी मुंबईत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला केले. मराठा आरक्षणाचा लढा संपल्यानंतर मुस्लिम समाजासाठी लढणार असल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

### महादेव मुंडे हत्या प्रकरणात ४ आरोपींना अटक:आमदार रोहित पवार यांची माहिती, २ वर्षे उशिराने पोलिसांना आज मुहूर्त मिळाल्याचा टोला

बीड - बीड जिल्ह्यातील बहुचर्चित महादेव मुंडे हत्या प्रकरणात अखेर ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. महादेव मुंडे यांच्या पत्नीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ही कारवाई झाल्यामुळे या प्रकरणी आता मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परळी येथील व्यापारी तथा पिग्मी एजंट महादेव मुंडे यांची २१ ऑक्टोबर २०२३ रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यांचा मृतदेह परळी तहसील कार्यालयासमोरील मैदानात आढळला होता. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पण अद्याप एकाही आरोपीला अटक करण्यात आली नव्हती. अखेर महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी गुरूवारी या प्रकरणी मुख्यमंत्री महादेव मुंडे यांची भेट घेतली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाच्या एसआयटी चौकशीचे आदेश दिले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे शुक्रवारी या प्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणी आरोपींची नावे कळली नाहीत. पण ही एक मोठी कारवाई असल्याचे मानले जात आहे.




### २१ ऑक्टोबर २०२३ रोजी महादेव मुंडे यांचा खून झाला, २० महिन्यानंतरही आरोपींना अटक नाही

२१ ऑक्टोबर २०२३ रोजी महादेव मुंडे यांचा खून झाला होता. २२ ऑक्टोबर रोजी १२:१५ ते १:३० असे सव्वा तास परळी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन चालले. पोलिसांनी पंचनामा केला तेव्हा त्यात अंगावर जखमा झाल्याने मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यांच्या अंगावर रक्ताने माखलेली पांढरी बनियान, ब्राऊन कलरचा शर्ट होता. लाल करदोडा आणि पाकीट होते. चेहरा, छाती आणि हात रक्ताने माखलेले होते. सव्वा तास हे पीएम चालले होते. या घटनेला तब्बल २० महिने लोटले त्यानंतरही यातील आरोपी निष्पन्न नाहीत. त्यामुळेच महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आत्महत्येचा प्रयत्न करत आपलं जीवन संपवण्याचा प्रयत्न केला होता









## संपादकीय

# नवप्रज्ञेची यशोगाथा

नागपूरच्या दिव्या देशमुखने बुद्धिबळ वर्ल्ड कप जिंकून इतिहास रचत ही कामगिरी करणारी ती पहिली भारतीय महिला ठरली आहे. आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण सुधारणा करण्याच्या वृत्ती, तसंच प्रतिकूल परिस्थितीत शांत राहून खेळ उंचावण्याची तिची क्षमता उल्लेखनीय आहे. तिच्या या यशाचा सर्व भारतीयांना गर्व आहे.

चार वर्षांची असताना मोठ्या बहिणीसोबत बॅडमिंटनसाठी गेली होती. मात्र, या मुलीला ते जमणार नाही, असे सगळ्यांच्या लक्षात आले. मग तिच्या आई-वडिलांनी शेजारच्याच बुद्धिबळ क्लासमध्ये तिला दाखल केले. डॉक्टर दाम्पत्याच्या या मुलीने मग घरच्यांना आश्चर्याचे धक्केच देण्यास सुरुवात केली. गोष्ट साधारण बारा वर्षांपूर्वीची. भारताचा विश्वनाथन आनंद आणि नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन यांच्यात चेन्नईत जागतिक बुद्धिबळ विजेतेपदाची लढत सुरू होती. त्यानिमित्ताने तमिळनाडू सरकारने विविध स्पर्धा घेतल्या होत्या. त्यात राष्ट्रीय वयोगटाच्या स्पर्धाही होत्या. त्यातील विजेते सर्वांसाठीच नवे होते. त्यातील एक छोटी मुलगी सगळ्यांच्या लक्षात राहिली. त्या छोट्या मुलीत नम्रता होती; पण सोबत होता कमालीचा आत्मविश्वास. तिचे नाव दिव्या देशमुख . आज त्यानंतर एका तपाने दिव्याने बुद्धिबळ वर्ल्ड कप जिंकला आहे. ही स्पर्धा जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली आहे. आणि 'ही केवळ सुरुवात आहे... पुढील लक्ष्य मोठ्या विजयाचे,' अशी भावनाही तिने व्यक्त केलेली आहे. दिव्याच्या या आत्मविश्वासाला जोड, डावाच्या अंतिम टप्प्यातील चुकांवर मात केल्याशिवाय प्रगती होणार नाही याबाबत तिला असलेल्या जाणीवेची. आत्मविश्वास व आत्मपरीक्षण यांचे समीकरण हे मोठ्या खेळाडूचे लक्षण; जे दिव्यामध्ये लख्खपणे दिसते आहे. नवप्रज्ञेच्या यशोगाथेचे हे आनंददायी दर्शन आहे.

नागपूरकर दिव्याने विजेतेपद जिंकल्यानंतर अनेकांनी तिचे कौतुक केले. मात्र, बुद्धिबळ जगतात एक प्रतिक्रिया सर्वांच्या लक्षात राहील ती ऑलिम्पियाड विजेत्या भारतीय संघाचे कर्णधार; तसेच प्रशिक्षक श्रीनाथ नारायणन यांची. 'प्रतिकूल परिस्थितीत कमालीचे शांत राहत कामगिरी उंचावण्याची दिव्याची क्षमता जबरदस्त आहे. याबाबत तिची तुलना अखेरच्या षटकात विजय मिळवून देणाऱ्या महेंद्रसिंह धोनीशीच करता येईल. महत्त्वाच्या सामन्यात दडपणाखाली दिव्या कामगिरी उंचावते, हे मी २०१८पासून अनुभवले आहे,' हे श्रीनाथ यांचे सांगणे. भारतीय संघाचे प्रशिक्षक अभिजित कुंटे यांची प्रतिक्रियाही मोलाची आहे. 'बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सर्व डाव खेळण्याचे दडपण ती घेऊ शकते, त्यामुळेच तिला तशी कल्पना दिली आणि तिने सुवर्णपदक जिंकून भारतास विजेते केले,' याकडे कुंटे लक्ष वेधतात.

दिव्या आणि कोनेरू हम्पी यांच्यातील लढतीचा आढावा घेता, डावाच्या अंतिम टप्प्यात हम्पी दडपणाखाली सरस खेळ करते व तो निर्णायक ठरेल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र, दिव्याच्या धडाक्यापुढे हम्पी कोलमडली. तिच्याकडून झालेल्या चुकांचा फायदा दिव्याने घेतला. हम्पीने काही महिन्यापूर्वी जागतिक जलद स्पर्धा जिंकली होती; त्यामुळे दिव्यासमोरील आव्हान किती खडतर होते, याची कल्पना येते. दिव्याची मूळची शैली आक्रमक. काही वर्षांपासून तिने आपल्या बचावाकडेही लक्ष दिले आहे, खेळात वैविध्य आणले आहे. काही वर्षांच्या काळात दिव्याने आशियाई वरिष्ठ स्पर्धा, वीस वर्षांखालील जागतिक स्पर्धा, बुद्धिबळ ऑलिम्पियाड या सर्व ठिकाणी यश मिळवले. धडाकेबाज प्रारंभाला डावाच्या मधल्या टप्प्यातील धारदार आक्रमणाची जोड आणि सोबत हार न मानण्याची वृत्ती तिला यशोमार्गावर नेत आहे. 'मला कोणाहीविरुद्ध खेळण्याची धास्ती वाटत नाही आणि मी अखेरपर्यंत हार मानत नाही,' असे सांगणारा दिव्याचा आठ वर्षांपूर्वीचा व्हिडिओ पुन्हा प्रसारित होत आहे, तो उगाच नव्हे.

# कडुबाई खरातांच्या गाण्यांतून अण्णाभाऊंच्या गौरवाचा गोडवा

## प्रचंड जल्लोषात गेवराईच्या तरुणाईने धरला ठेका





गेवराई (प्रतिनिधी)

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या संगीत- सांस्कृतिक कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका कडुबाई खरात यांच्या गोड आवाजातील गाण्यांवर तरुणाईने ताला-सुरात ठेका धरला. अहो, गणित बघा विचारून त्या वादळ वार्याला, अण्णाभाऊंच नाव दिलं आकाशातील ताऱ्याला, घ्या सजवून समाज मस्त, अन दाखवा पावर जबरदस्त..! या आणि अशा विविध प्रबोधनात्मक गाण्यांची बरसात करून कडुबाई खरात यांनी धमाल उडवून दिली. कडुबाई खरातांच्या गाण्यातून अण्णाभाऊंच्या गौरवाने शहरातील तरुणाईने प्रचंड जल्लोषात ताला-सुरातठेका धरल्याने कार्यक्रमात रंगत आली.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यशराज पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दि ३० रोजी सायंकाळी ८ वाजता साठेनगर येथे प्रसिद्ध गायिका कडुबाई खरात यांच्या गोड आवाजातील संगीत-सांस्कृतिक ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गणित बघा विचारून त्या वादळ वार्याला, अण्णाभाऊंच नाव दिलं आकाशातील ताऱ्याला, घ्या सजवून समाज मस्त, अन दाखवा पावर जबरदस्त,भीम माझं ग, दिल्लीत भाषण देई, तुम्ही खातात त्या भारीवर बाबासाहेबांची सही हायरं, माजी मैना गावावर राहीली, राजा राणीच्या जोडीला सात मजली माडिला, सांगा कुणाचं योगदान लाल दिव्याच्या गाडीला..! गायिका कडुबाई खरात यांनी एकापेक्षा एक सरस गाणी सादर करून, कार्यक्रमात रंगत आणली. या गाण्यांवर तरुणाईने ताला-सुरात ठेका धरला. साहित्यरत्न लोकशाहीर डॉ आण्णाभाऊ साठे सार्वजनिक १०५ व्या जयंतीनिमित्त शतनाम गायिका कडूबाई खरात यांची संगीत मैफिल गेवराईत रंगली. साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्यातील ख्यातनाम भारुड तसेच लोक प्रबोधन पर गीतकार श्रीमती कडूबाई खरात यांचा लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित व साहित्य व आधारित लोकप्रबोधन पर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार बांगर, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, युवानेते रोहित पंडित, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यशराज पंडित, युवानेते शिवराज पवार, उद्धव मडके, उपाध्यक्ष प्रभाकर पिसाळ, उपाध्यक्ष अरुण मस्के, सचिव शरद मोटे, पप्पू गायकवाड, संघटक शेख अमजद बब्बु, सय्यद एजाज, किशोर वादे, कोषाध्यक्ष उद्धव मडके, रवि पवार, सहसचिव- अण्णासाहेब राठोड, कोषाध्यक्ष -उद्धव बापु मडके, सहकोषाध्यक्ष-आबा ढाकणे, रविंद्र पवार, मार्गदर्शक - रविंद्र बोराडे, कार्याध्यक्ष - रंजित घुंबार्डे, सहकार्याध्यक्ष- शिनु भाऊ बैदरे संघटक -सय्यद एजाज, किशोर वादे, सहसंघटक -शेख अमजद बब्बु, डिजीटल प्रसिद्ध प्रमुख -रविंद्र पवार ,सदस्य प्रभाकर भालशंकर, गुफरान इनामदार, अमोल दावडकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. समाजबांधवानी कार्यक्रमासाठी यशस्वी प्रयत्न केले.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ६३६ / २०२५**

युवराज संदिप टकले विरूध्द- निरंक
(मार्फत - अँड. पी पी जरांगे )

ज्याअर्थी मयत नामे संदिप अंकुश टकले हे दिनांक २२.०५.२०२५ रोजी मौने रा. टकलेवाडी तहत बंगाली पिंपळा, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले आहेत..

अर्जदार
१. युवराज संदिप टकले वय. २० वर्षे धंदा - शेती
रा. टकलेवाडी तहत बंगाली पिंपळा, ता. गेवराई, जि. बीड
२. प्रज्ञा संदिप टकले वय. १८ वर्षे धंदा - शिक्षण
रा. टकलेवाडी तहत बंगाली पिंपळा, ता. गेवराई, जि. बीड
३. गंगासागर संदिप टकले वय. ४० वर्षे धंदा - शेती
रा. टकलेवाडी तहत बंगाली पिंपळा, ता. गेवराई, जि. बीड
४. प्रयागाबाई अंकुश टकले वय. ६५ वर्षे धंदा घरकाम
रा. टकलेवाडी तहत बंगाली पिंपळा, ता. गेवराई, जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घ घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे संदिप अंकुश टकले रा. टकलेवाडी तहत बंगाली पिंपळा, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : ०९/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर, गेवराई

शिक्का

आदेशावरून/-
**स्वाक्षरित/-**
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर,
गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ४९५/२०२५**
**अंकुश घोंडीराम राठोड-विरुध्द निरंक**
**(मार्फत ॲड. एस व्ही राठोड )**

ज्याअर्थी मयत नामे धोंडीराम हरसिंग राठोड हे दिनांक १२.०२.२०१९ रोजी मौजे रा.ठाकरवाडी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार
१.अंकुश धोंडीराम राठोडवय ६५ वर्षे धंदा -शेती
रा. ठाकरवाडी, ता. गेवराई, जि. बीड
२. अनिल धोंडीराम राठोड वय. ४७ वर्षे धंदा-शेती
रा. ठाकरवाडी, ता. गेवराई, जि. बीड
३.अनुसया देविदास पवार वय ७० वर्षे धंदा शेती
रा. जयरामनाईक तांडा पाचेगांव, ता. गेवराई, जि. बीड
४. संजीवनी बलवंतसिंग जाधव वय ६० वर्षे धंदा - शेती व घरकाम
रा. गुरुद्वारा परिसर नांदेड ता. जि. नांदेड
५.मेनका सुभाष पवार वय ४० वर्षे धंदा - शेती व घरकाम
रा. पिंपरखेड पो. चिंचखेड ता. अंबड जि. जालना

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे धोंडीराम हरसिंग राठोड रा. ठाकरवाडी, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर, गेवराई

शिक्का

आदेशावरून/-
**स्वाक्षरित/-**
सहाय्यक अधीक्षक
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर, गेवराई

# परिवर्तनाचा साक्षीदार.... पत्रकार उत्तम हजारे

छत्रपती संभाजीनगर....

तब्बल दीड डझन दैनिकांत प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष पत्रकारितेचा अनुभव घेतलेले बीड येथील ज्येष्ठ पत्रकार व आमचे मित्र उत्तम हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त ( दि.२ ऑगस्ट ) मुक्तचिंतन.....

पत्रकारितेचे माझे शिक्षण व प्रशिक्षण संपल्यानंतर पहिली नोकरी मिळाली ती लोकमत बीड कार्यालयात. माझा हाच जिल्हा असल्यामुळे ईथल्या राजकीय -सामाजिक चळवळीची माहिती बर्यापैकी होती. बीडमध्ये आठ वर्षे पत्रकारिता करीत असताना ज्या काही पत्रकार मित्रांशी स्नेहबंध जोडले गेले अशापैकी एक असलेले उत्तम हजारे. लोकाशाच्या बीड जिल्हा आवृत्तीचे प्रमुख म्हणून सध्या ते कार्यरत आहेत. आज उत्तमभाऊचा वाढदिवस, या निमित्ताने झुंजार पत्रकार मित्राविषयी हा शब्द प्रपंच..

फुले -शाहू -आंबेडकरी विचारांची शिदोरी सोबत घेऊन गेल्या अडीच दशकांपासून ते माध्यम क्षेत्रात कार्यरत आहेत. पत्रकारितेच्या या प्रवासात सध्या लोकाशा परिवारात ते चांगलेच रमले आहेत. लोकाशा परिवारातील हा त्यांचा दुसरा वाढदिवस. समाजाभिमुख पत्रकारितेचे एक वर्तुळ पूर्णत्वास जाताना आज दिसत आहे. नवाकाळ, पुढारी, पुण्यनगरी, झुंजार नेता, सम्राट आदी दैनिकात त्यांनी पत्रकात त्यांनी विविध पदावर कामे केली आहेत. अग्रलेखाचे बादशहा मा. निळूभाऊ खाडिलकर, पदमश्री डॉ. प्रतापसिंह जाधव, मुरलीधर बाबा शिंगोटे, मोतीराम वरपे, बबन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची पत्रकारिता बहरली. या दैनिकांमध्ये केवळ बीडच नव्हे तर मराठवाड्याची बातमीदारी करायची संधी त्यांना मिळाली. आठ- दहा वर्षे बीड येथूनच मराठवाडयातील आठही जिल्हयातील प्रश्न पुढारी व नवाकाळमधून त्यांनी मांडले. या दैनिकांशी आजही त्यांचा स्नेह कायम आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मराठवाडा, लोकमत, चंपावतीपत्र, रिपोर्टर, सिदंफणा, पार्श्वभूमी, सोलापुर संचार, नगर सार्वमत यासह विविध दिवाळी अंकात साहित्य व विविध सदरात त्यांनी लेखन केले. अगदी सुरुवातीच्या काळात ज्येष्ठ संपादक नरेंद्र कांकरिया यांच्या संकेत व परळीच्या मराठवाडा साथी दैनिकात शिकाऊ पत्रकारिता केली. मुंबईतील एक वर्षाच्या काळात मुंबईतील विविध दैनिकाशी त्यांचा सबंध आला.



तब्बल पंचवीस वर्ष म्हणजेच १९९५ पासून आजपर्यंत जनतेसाठी पत्रकारिता त्यांना करता आली. माध्यमे बदलती, पत्रकारितेची साधने बदलली, कोरोना-लॉकडाऊन काळात पत्रकारिता व माध्यमे संकटात आली. आता डिजीटल माध्यमाचे युग आहे, या युगातही प्रिंट मिडीया हाच विश्वास पात्र आहे, हे नव्याने सिद्ध करण्याची वेळ आली आहे. अशा वेळी अनेक दैनिकात आलेला अनुभव पाठिशी घेत लोकाशाचे मुख्य संपादक तथा समाजभूषण विजयराज बंब यांच्या मार्गदर्शनाखाली ती कार्यरत आहेत. लोकाशा ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक रोशन बंब यांनी दिलेली जबाबदारी ते पार पाडीत आहेत. पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्याचे हित आपली जात झाले यासाठी कार्यरत राहिले आहेत. बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांचा प्रश्न रेल्वेचा प्रश्न यासह असंख्य विषयांवर त्यांनी वृत्तमालिका लिहिलेल्या आहेत. ज्या लोकशा दैनिकाचे बीड जिल्हा निवासी संपादक प्रति सांभाळत आहेत याचा मी संस्थापक राहिलेलो आहे. माझा सहकारी संतोष जोगदंड हा उत्तम आणि मला जोडणारा दुवा आहे. तर बंब साहेब म्हणजे अत्यंत दिलदार व मोठ्या मनाचा माणूस आहे. त्यांच्यासोबत दोन वर्ष मला व्यवसायिकता, धाडस व चिकाटी हे गुण शिकता आले. बंब साहेब दररोज कार्यालयात आले काय 'प्रॉलेम' आहे, असे म्हणत असत. 'प्रॉब्लेम'चा साठी त्यांचा हा खास शब्द. शब्दाचा सोडा मात्र जगातील कुठलाही प्रॉब्लेम आला तर ते सोडवण्यासाठी लागणारा पैसा आणि धाडस या दिलदार माणसाकडे असल्याचे मी जवळून अनुभवले आहे. पत्रकारितेत शब्दांपेक्षाही आकड्यांना जास्त महत्त्व असते हे मला कळून चुकले. उत्तम हजारे यांनी बंब साहेबांची साथ प्रामाणिकपणे निभवावी. यातच त्यांची प्रगती आहे असे आम्हा मित्रांना वाटते. यातच त्यांचे सौख्य सामावलेले आहे.

परिवर्तनवादी विचारधारा हा त्यांचा वसा आहे आणि वारसा आहे. परिवर्तन या शब्दात 'वर्तन' देखील समाविष्ट असते याची जाणीव त्यांनी विसरता कामा नये. तर अशा या पत्रकार मित्राने शिरसमार्ग (ता. गेवराई) येथून सुरू केलेली वाटचाल आज वयाच्या पन्नाशीत पोहोचली आहे. पत्रकारीतेची पंचविशी अर्थात रौप्य महोत्सव पूर्ण झाला आहे. एक मुलगा डॉ. सुजित हजारे हा मेडीकल ऑफीसर झाला आहे तर दुसरा नोबेल हजारे हा तैवान देशात उच्च शिक्षण घेत आहे .

पत्रकार म्हणून फार मोठा पैसा नाही मिळविता आला मात्र नावलौकिक खूप कमावला आहे. अन्य मंडळीप्रमाणे लुच्चेगिरी अन् हुजेरीगिरी उत्तमच्या रक्तातच नाही. काही मंडळींनी तर नेत्यांच्या मागे पुढे फिरून अन् अधिकाऱ्यांची दलाली करून चांगला जमिनी - जुमला कमावला आहे. जुमलेबाजी करणे ऊत्तमला कधीच जमले नाही.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला स्वाभिमानाचा विचार हा त्यांचा श्वास आहे आणि ध्यासही.

अशाप्रकारे स्वत:सोबत समाजाचे परिवर्तन घडण्याची क्षमता असणाऱ्या या पत्रकार मित्राला वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा. या निमित्ताने तुमच्या अत्यंत कष्टमय जीवनाची वाटचाल म्हणताना शेवटी मजरूह सुल्तानपुरी यांच्या ओळी मला आठवत आहेत...



# नाथसागरातून विसर्ग; दोन दिवसांत गेवराईच्या बोरगावमध्ये येणार पाणी

गेवराई /प्रतिनिधी

पैठण येथील जायकवाडी प्रकल्प ९० टक्क्यांपेक्षा जास्त क्षमतेने भरला आहे. पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसामुळे व ऊर्ध्व भागातील धरणांमधून येणारी आवक सुरू असल्याने गुरुवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास जायकवाडी धरणाचे १८ दरवाजे अर्ध्या फुटाने उघडून गोदावरी नदीपात्रात ९ हजार ४३२ क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, पुढील दोन दिवसांत हे पाणी गेवराई तालुक्यात पोहोचणार आहे. बोरगाव येथून गेवराई तालुक्याची हद्द सुरू होते. सध्या गोदापात्रात चांगले पाणी असल्याने व विसर्ग सुरू झाल्याने पूरस्थितीचा धोका आहे.

यंदा मे महिन्यातच राज्यात चांगल्या प्रकारे पाऊस झाला. त्यामुळे प्रथमच मे महिन्यात पैठणच्या जायकवाडी धरणात चांगल्या प्रकारे जलसाठा झाला होता. त्यात जुलै महिन्याच्या दुसऱ्या, तिसऱ्या आठवड्यात चांगला पाऊस झाल्याने नाथसागरातील पाणीपातळी वाढत होती. धरण ९० टक्क्यांवर पोहोचल्याने धरणातून गोदावरी नदीपात्रात गुरुवारी दुपारी विसर्ग सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, जायकवाडीतून गोदापात्रात विसर्ग केल्यानंतर बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यात सर्वात आधी हे पाणी पोहोचते. त्यानंतर माजलगाव तालुक्यात जाते. गोदावरीच्या काठावर असलेल्या दोन्ही तालुक्यांतील सुमारे ५० गावांना यामुळे पूरस्थितीचा सामना करावा लागतो, असा पूर्वानुभव आहे.

या गावांना सतर्कतेच्या सूचना गेवराई तालुक्यातून गेलेल्या गोदावरी तीरावरील ३२ गावांना पूर आल्यास पाण्याचा वेढा पडतो. यामध्ये राजापूर, आगरनांदूर, संगम जळगाव, हिंगणगाव, गोंदी खु., कटचिंचोली, पांगुळगाव, सुरळेगाव, पांचाळेश्वर, राक्षसभुवन, म्हाळस पिंपळगाव, सावळेश्वर, खामगाव, गंगावाडी, काठोडा, नागझरी, राहेरी, बोरगावथडी, भोगलगाव, पांढरी, मिरगाव, तपेनिमगाव, ढालेगाव, श्रीपत अंतरवाला, गोपत पिंपळगाव, रामपुरी, मनुबाई जवळा, गुळज (भगवाननगर), पाथरवाला (बु), गुंतेगाव, पाथरवाला (खु.), बोरगाव (बु.) या गावांचा समावेश आहे.

या दिल्या आहेत सूचना नदीपात्रात अनावश्यक जाऊ नका, जनावरे नदीपात्रात बांधू नका, शेतीची अवजारे नदीपात्रात असतील तर ती काढून घ्या, पूरस्थिती उद्भवल्यास प्रशासनाला संपर्क करा, आपत्ती व्यवस्थापनाची टीम तयार आहे.

# अण्णाभाऊची लेखणी हा केवळ एक ऐतिहासिक ठेवा नसून ती एक क्रांतीची मशाल आहे- राजकिशोर मोदी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे याची लेखणी व त्यांचे साहित्य हे केवळ एक ऐतिहासिक ठेवा नसून ती एक क्रांतीची मशाल आहे असे परखड मत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अण्णाभाऊ साठे चौकात त्यांना अभिवादन करतांना बोलत होते.यावेळी राजकिशोर मोदी याच्यासोबत महादेव आदमाणे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.



जयंतीनिमित्त अभिवादन करतांना राजकिशोर मोदी पुढे म्हणाले की १ ऑगस्ट ही केवळ एक तारीख नाही, तर एका युगप्रवर्तक साहित्यिकाच्या जन्माची स्मृती आहे. या दिवशी शोषितांच्या वेदना लेखणीतून पेटवून, हजारो-लाखो दुःखी जीवांना आत्मभान देणारे एक 'लोकशाहीर' जन्मास आले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे दलित साहित्याचे जनक होते.त्यांनी तमाशा आणि लोकनाट्याच्या माध्यमातून क्रांतीचे अनेक गीत गायले. संपूर्ण जगाच्या साहित्य विश्वात आपला एक आगळावेगळा ठसा उमटवला. १९२० साली सांगली जिल्ह्यातल्या वटेगाव या खेडेगावात जन्मलेल्या अण्णाभाऊंचे बालपण हे अत्यंत उपेक्षेचे असेच गेले. बालवयातच शिक्षणाचा मार्ग बंद झाल्याने मोलमजुरी करतांना त्यांना आयुष्याचा अस्सल अनुभव मिळाला आणि तेच वास्तव त्यांच्या लेखणीत झळकले असल्याचे मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले.

अण्णाभाऊ साठे यांनी लोक कलेसारख्या तमाशाला केवळ करमणुकीपुरते मर्यादित न ठेवता ते समाज जागृतीचे शस्त्र बनवले. त्यांच्या लेखणीचा प्रवास हा मानवाच्या आत्मसन्मानाचा प्रवास ठरल्या गेला आहे. अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांची ही ज्योत नव्या पिढीपर्यंत पोचवण्याचे आपले कर्तव्य असल्याचे राजकिशोर मोदी यांनी उपस्थित आपल्या सहकार्यांना सांगितले.

अण्णाभाऊ साठे यांनी स्त्रीशक्तीच्या उत्थानासाठी, मजुरांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी मुंबई गाठली. तिथे गेल्यावर त्यांनी बांधकाम मजूर, कामगार म्हणून काम केले. या कामातूनच त्यांना खऱ्या जीवनाची परीक्षा अनुभवयास मिळाली. या खडतर प्रवासातूनच त्यांच्या साहित्याला जीवन मिळाले. त्यांनी जीवनात जे अनुभवले तेच त्यांच्या साहित्यात अवतरले आहे अशी भावना देखील राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकामध्ये त्यांच्या चौकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना बबन लोमटे, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, धम्मा सरवदे, अशोक देवकर, सुदाम देवकर, अंकुश हेडे, खलील जाफरी, अकबर पठाण, गोविंद पोतंगले,आकाश कऱ्हाड, उज्जेन बनसोडे, कैलास कांबळे, विशाल पोटभरे, रोहन कुरे,संतोष चिमणे, अमित परदेशी, रोहित साठे, शरद काळे, सिद्धार्थ साबळे, मुन्ना वेडे, मुनिर शाह, गुड्डू जोगदंड यांच्यासह अनेक जण सहभागी झाले होते.

# शिवशाही बस आणि ऑटोरिक्षा धडकेत एक जागीच ठार

परळी (प्रतिनिधी)

परळी-बीड मार्गावर पांगरी तांडा परिसरात शुक्रवार (दि १) रोजी सकाळी नऊच्या सुमारास भीषण अपघात झाला. बीडहून नांदेडकडे जाणाऱ्या शिवशाही एसटी बसने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षाचालक जागीच ठार झाला. या घटनेने परिसरात तणाव निर्माण होऊन काही काळासाठी वाहतूक ठप्प झाली होती.

मृत रिक्षाचालकाचे नाव श्रीनिवास शिवाजी राठोड (वय २३, रा. पांगरी तांडा) असे आहे. त्यांनी रिक्षातून काही प्रवाशांना कामाच्या ठिकाणी सोडल्यानंतर पांगरी रोडने तांड्याकडे परतत असताना शिवशाही बसने (एमएच ०४ एफएल ०९८८) त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात रिक्षा काही



अंतर फरफटत गेल्याने श्रीनिवास राठोड यांचा जागीच मृत्यू झाला.अपघातानंतर संतप्त नागरिकांनी एसटी बसच्या काचा फोडल्या. घटनास्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवाशांनीही घटनास्थळी उतरून मदतीचा हात दिला. दरम्यान, परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मजहर सय्यद, उपनिरीक्षक शेख, सहाय्यक फौजदार लक्ष्मण टोले, जमादार दत्ता उबाळे, रमेश तोटेवाड, सुनील अन्नमवार आदींनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत वाहतूक सुरळीत केली व परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेची नोंद परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात येत असून, पुढील तपास सुरू आहे.

# धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सवानिमित्त राजेंद्र महाराज वाघमारे यांचे किर्तन

वडवणी/प्रतिनिधी

धुनकवाड गावचे ग्रामदैवत धुनकेश्वर देवस्थान येथे गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेल्या श्रावण सोमवार महोत्सवानिमित्त दुसरा सोमवार दि.४ ऑगस्ट २०२५ रोजी ११ते १ किर्तनसेवा रामायणाचार्य ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे(गोंदीकर)यांचे किर्तन होणार आहे तरी या पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



धुनकवाड येथील धुनकेश्वर देवस्थानात गेल्या नऊ वर्षांपासून ह.भ.प.भागवताचार्य श्रीराम महाराज शेळके यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या श्रावण महोत्सवाचे प्रति वर्षाप्रमाणे या ही वर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन चार सोमवारी नामवंत किर्तनकारांचे किर्तन होणार असुन पहिल्या श्रावण सोमवार दि.२८जुलै २०२५ रोजी भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके यांचे किर्तन झाले आहे.तर दुसऱ्या सोमवारची किर्तन सेवा ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे यांचे होणार आहे.तरी पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या हरिकिर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादाचे यजमान केशव इंद्रसेन मुंडे,शिवाजी काशिनाथ यादव,अच्युत त्रिंबक कागणे,शिवाजी रामा गावडे,जगदीश बंकटी गोरे,गोवर्धन अरुण यादव,सुंदर साहेबराव भोसले,राम दशरथ यादव,बालासाहेब रामा काळे,बापू महादेव रोटे,विजय अंबादास खेरमोडे,दत्ता विष्णू यादव,नितीन बाबू जावळे,महादेव सटवा कागणे,अनिल शंभू काजळे,दिनकर सदाशिव मुंडे,नवनाथ प्रभाकर गावडे,कचरू रावसाहेब गावडे,राजेभाऊ अंबादास खैरमोडे,अशोक बाबासाहेब भोसले,बालासाहेब यशवंत देशमाने, धनंजय अशोक यादव,सुदाम रावसाहेब गावडे,रामेश्वर ईराप्पा यादव,नारायण अप्पाराव यादव,श्रीकिसन सोपान कागणे,बारीकराव धोंडीबा बिल्पे,गोरख सदाशिव बोडके,ज्ञानेश्वर गंगाधर राऊत,राम बबन धरपडे,मच्छिंद्र गोविंदराव गावडे, शंकर सटवा काजळे, दत्ता अर्जुन अंडील,हनुमान नवनाथ गायके,सर्वेश संतोष कचरे,मुंजाबा अर्जुन यादव यांच्यासह धुनकेश्वर श्रावण महोत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीचा आदर्श घ्यावा

## छत्रपती शाहू महाराज वाचनालयातील कार्यक्रमात प्रा. प्रकाश खळगे यांचे प्रतिपादन

वडवणी (प्रतिनिधी)

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीचा आदर्श घ्यावा असे प्रतिपादन लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा छत्रपती शाहू महाराज वाचनालयाचे सचिव प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांनी केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरखेड येथील छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर आणि कार्यावर शाळेतील विद्यार्थ्यांनी विचार मांडले. गावातील जिल्हा परिषद शाळेतील अगदी पहिलीपासून ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थी विद्यार्थिनींना ग्रंथालयातील कर्मचारी सौ. शीलाताई सुखदेव उजगरे ह्या प्रेरणा देऊन त्यांना वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी रोज नवीन नवीन संकल्पना आणि नवनवीन उपक्रम राबवतात. विद्यार्थ्यांना वाचनालयाकडे येण्यासाठी प्रभावित करतात. त्यामुळे गावातील अनेक विद्यार्थी या संस्कार केंद्राचा मोठा फायदा घेत आहेत. गावातील पालक तसेच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी सुद्धा या संस्कार केंद्राचा भरपूर फायदा घेत आहेत. सदरील कार्यक्रमांमध्ये उपस्थित असणाऱ्या जनसमुदाया समोर छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाचे सचिव प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर व लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर आपले परखड विचार व्यक्त केले. प्रत्येक विद्यार्थ्याने वाचकाने अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे विचार जीवनात जर आत्मसात केले तर विद्यार्थ्यांना खूप चांगली प्रेरणा मिळेल व आपल्या जीवनामध्ये ते यशस्वी होऊ शकतात. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने, पालकाने या संस्कार केंद्रामध्ये येऊन विविध प्रकारची पुस्तके वाचावीत अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा सर्वांनी फायदा घ्यावा. लोकमान्य टिळकांचे साहित्य सुद्धा आत्मसात करावे, आपल्या जीवनामध्ये यशस्वी व्यक्ती निर्माण व्हावे अशी भावना प्रा. खळगे यांनी व्यक्त केली .या कार्यक्रमाच्या निमित्ताने सतत कार्यरत असणाऱ्या अंगणवाडी ताई अग्नीताई खळगे



आणि या ग्रंथालयाच्या कर्तव्यदक्ष कर्मचारी सौ. शीलाताई सुखदेव उजगरे या दोन महिला आपला संपूर्ण वेळ विद्यार्थ्यांच्या हितासाठी, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी, आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनाकडे चांगल्या दृष्टीने पाहण्यासाठी व त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी या नवनवीन संकल्पना निर्माण करून, विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात. अशा संस्कार केंद्रामुळे ग्रामीण भागातील अतिशय चांगले वातावरण तयार झालेले आहे. अशा संस्कार केंद्राची नितांत गरज असल्याचे मतही खळगे सर यांनी व्यक्त केले . या जयंतीच्या व स्मृतिदिनाच्या निमित्ताने अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेऊन आपले प्रभावी विचार मांडले. त्यामध्ये स्वरा श्रीनिवास मुंडे, शिवानी दत्ता साबळे, निकिता दगडू खळगे, नेहा दगडू खळगे, नंदनी अनिल अडागळे, अनन्या जितेंद्र खळगे सानिया निशिकेश गायकवाड, अमृता भागवत गायवळ, मालविका श्रीकृष्ण निपटे या विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. सर्वांना यानिमित्त खाऊचे वाटप करण्यात आले.

# महाराष्ट्रातील निवडणूक निष्पक्ष, तपासणीत ईव्हीएम-व्हीव्हीपॅट निर्दोष आढळले - निवडणूक आयोग

मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुकीत वापरलेले सर्व ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट तपासणीत योग्य असल्याचे आढळले. त्यामुळे निवडणूक निष्पक्ष असून निकालांबात शंकेला वाव नसल्याचा निर्वाळा निवडणूक आयोगाने दिला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधीसह आपपल्या मतदारसंघात पराभूत झालेल्या १० उमेदवारांच्या तक्रारींनंतर आयोगाकडून हे पाऊल उचलण्यात आले.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी १० उमेदवारांच्या विनंतीनुसार १० मतदारसंघांमध्ये क्रॉस-चेकिंग केले. या प्रक्रियेत ८ उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष उपस्थित राहून तपासणी पाहिली. तर, दोन उमेदवारांनी उपस्थित राहणे टाळले. यावेळी एकूण ४८ मतदार युनिट, ३१ नियंत्रण यंत्रे आणि ३१ व्हीव्हीपॅट यांची तपासणी झाली. त्याचप्रमाणे, निवडक मतदारसंघांमधील उमेदवारांच्या विनंतीवरून मायक्रोकंट्रोलर व मेमरी पडताळणीसाठी निदान चाचणी घेण्यात आली.

राज्यातील कोपरी-पाचपाखाडी, ठाणे, खडकवासला आणि माजलगाव या काही मतदारसंघांमध्ये मायक्रोकंट्रोलर व मेमरी पडताळणीसाठी निदान चाचण्या करण्यात आल्या. तर पनवेल, अलीबाग, आर्णी, येवला, चंदगड, कोल्हापूर उत्तर आणि उर्वरित माजलगावमध्ये निदान चाचणीसह मॉक पोलही घेण्यात आला. सर्व चाचण्यांदरम्यान ईव्हीएम यंत्रे योग्य प्रकारे कार्यरत असल्याचे प्रमाणित झाले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, ईव्हीएम यंत्रांमध्ये कोणतीही छेडछाड करता येत नाही. त्यामुळे निवडणूक निकालांबाबत शंका घेण्याचे कारण नाही, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीत वापरलेले सर्व ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट तपासणीत योग्य असल्याचे आढळले. त्यामुळे निवडणूक निष्पक्ष असून निकालांबात शंकेला वाव नसल्याचा निर्वाळा निवडणूक आयोगाने दिला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधीसह आपपल्या मतदारसंघात पराभूत झालेल्या १० उमेदवारांच्या तक्रारींनंतर आयोगाकडून हे पाऊल उचलण्यात आले.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान/श्रीमती **वैशाली लक्ष्मण मोरे रा. अंबड ता.अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलगा च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म/मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदारशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | परसराम लक्ष्मण मोरे | मुलगा | ०८.०२.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान/श्रीमती **अजय रामचंद्र शिंदे रा. अंबड ता.अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलगा च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म/मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदारशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | खुशी अजय शिंदे | मुलगी | ०१.०९.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २२/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार श्रीमान/श्रीमती **सयाबाई माणिक शिंदे रा. अंबड ता.अंबड जि. जालना** यांनी यांच्या मुलगा च्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म/मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदारशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | हरिओम माणिक शिंदे<br>चांदणी माणिक शिंदे | मुलगा<br>मुलगा | ०१.०१.२००६<br>०१.०१.२००५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# आदर्श शिक्षण विस्तार अधिकारी श्री. तुळशीदास कोकणे व श्री. शिवाजी कसरे यांचा सेवापूर्ती निमित्ताने राजेंद्र लाड यांनी घेतलेला आढावा.....

मूळ आष्टी येथील रहिवासी व जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चकलांबा येथे प्राथमिक पदविधर असलेले आदर्श शिक्षक तुळशीदास झुंबर कोकणे व कुसळंब, ता. पाटोदा, जि. बीड व आष्टी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बिडसांगवी येथील मुख्याध्यापक आदर्श शिक्षक शिवाजी विठ्ठल कसरे यांना जिल्हा परिषद बीड ने दि. २३ जुलै २०२५ रोजीच्या एका आदेशान्वये शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती केलेली आहे. या दोनही आदर्श शिक्षकांना पदोन्नती मिळाल्यामुळे आष्टी, पाटोदा तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या दोघांनीही निस्वार्थपणे केलेल्या कामाची पोहोच पावती त्यांना मिळालेली आहे. सेवानिवृत्तीला अवघे काही दिवस शिल्लक असतानांच या दोनही आदर्श शिक्षकांना शिक्षण विस्तार अधिकारी (क.) या पदावर बढती मिळालेली आहे. दोघांच्याही दीर्घकाळच्या निस्वार्थ आणि समर्पित सेवेचे हे यथोचित फळ मिळाल्याने आष्टी, पाटोदा तालुक्यातील शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे. उलट, उभ्या आयुष्यात त्यांनी शिक्षण क्षेत्रात अत्यंत प्रामाणिकपणे आणि निस्वार्थ भावनेने काम केलेले आहे. तसेच तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देण्यासाठी, शाळेच्या प्रगतीसाठी त्यांनी घेतलेले कष्ट आणि त्यांचे योगदान हे नेहमीच प्रेरणादायी राहिलेले आहे. हे दोघेही आदर्श शिक्षक ३१ जुलै २०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवा निवृत्त झाले आहेत. तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी मोरेश्वर मंगल कार्यालय आष्टी, जि. बीड येथे आयोजित करण्यात आलेला आहे. अखेरच्या क्षणी मिळालेली ही बढती दोघांच्याही कठोर परिश्रमाचे आणि निष्ठावान सेवेचे प्रतीक आहे. शिक्षण विभागाने दोघांच्याही कार्याची दखल घेतल्याने, इतक्या वर्षांच्या सेवेचे सार्थक झाल्याची भावना व्यक्त होत आहे. आदर्श शिक्षक तुळशीदास कोकणे व शिवाजी कसरे यांचे गटशिक्षणाधिकारी, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, प्राथमिक पदविधर, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, साहित्यिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन झाले आहे. या दोघांनाही सेवापूर्ती निमित्ताने भावी वाटचालीसाठी तसेच निरोगी आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा...!!!

## शिक्षण विस्तार अधिकारी श्री. तुळशीदास झुंबर कोकणे



चिखली, ता. आष्टी, जि. बीड येथील मुळ रहिवासी शिक्षण विस्तार अधिकारी श्री. तुळशीदास झुंबर कोकणे यांचा जन्मदिनांक १९ जुलै १९६७ आहे. त्यांच्या शैक्षणिक सेवेची सुरुवात हरिनारायण स्वामीच्या पावनभूमीत म्हणजेच आष्टा हरिनारायण, ता. आष्टी, जि. बीड येथून ५ डिसेंबर १९८५ ला झाली. त्यानंतर एक वर्षाने त्यांची जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंग, ता. आष्टी, जि. बीड येथे ८ सप्टेंबर १९८६ ला बदली झाली. तेथे त्यांनी आपली शैक्षणिक सेवा सतरा वर्ष सहा महिने केली. तद्नंतर २८ फेब्रुवारी २००४ ला त्यांची बदली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पारगाव जोगेश्वरी, ता. आष्टी, जि. बीड येथे झाली.
सन २००५ साली त्यांना उत्कृष्ट शैक्षणिक सेवेबद्दल जिल्हा परिषद बीड चा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानंतर आठ वर्षानी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांबवा, ता. केज, जि. बीड येथे त्यांची बदली झाली. तेथील सेवा एक वर्षांची झाल्यानंतर पुन्हा त्यांची बदली जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आष्टा हरिनारायण, ता. आष्टी, जि. बीड येथे झाली. तेथे त्यांनी पुन्हा पाच वर्ष सेवा केली. नंतर २०१८ रोजी पुन्हा त्यांची बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बिडसांगवी, ता. आष्टी, जि. बीड येथे झाली. तेथून त्यांची २३ जून २०२३ ला जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चकलांबा, ता. गेवराई, जि. बीड येथे बदली झाली. तद्नंतर २४ जुलै २०२५ ला गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, पाटोदा येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती झाली. असा हा शैक्षणिक सेवेचा प्रवास नियतवयोमानानुसार दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी समाप्त झाला.

## शिक्षण विस्तार अधिकारी श्री. शिवाजी विठ्ठल कसरे



कुसळंब, ता. पाटोदा, जि. बीड येथील मूळ रहिवासी शिक्षण विस्तार अधिकारी श्री. शिवाजी विठ्ठल कसरे यांचा जन्मदिनांक १० जुलै १९६७ असून त्यांच्या शैक्षणिक सेवेची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लमाणवाडी, ता. आष्टी, जि. बीड येथून ३० नोव्हेंबर १९८५ पासून झाली. लमाणवाडी येथे ३ वर्ष ६ म. सेवा केली. त्यानंतर दि. २० जून १९८९ ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघळूज, ता. आष्टी, जि. बीड येथे ६ वर्ष ३ म. सेवा केली. यानंतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिवरा येथे १६ सप्टेंबर १९९५ ते १८ जुलै २००१ पर्यंत सेवा केली. त्यानंतर बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खाकाळवाडी येथे झाली. तेथे त्यांनी १९ जुलै २००१ ते ३० जून २०११ पर्यंत येथे सेवा केली. त्यांना स्वामी विवेकानंद पतसंस्थेने आदर्श शिक्षक म्हणून गौरविलेले असून गुणवत्ता विकास अभियान कार्यक्रमा अंतर्गत मा. रमणी साहेबांच्या पॅटर्न मध्ये त्यांनी प्रश्ननिर्मिती केलेली आहे. त्यानंतर दि १ जुलै २०११ ते २३ डिसेंबर २०११ पर्यंत जिल्हा परिषद केंद्रीय प्रा. शा. कन्या प्रशाला अमळनेर, ता. पाटोदा, जि. बीड या ठिकाणी कामकाज केलेले आहे. त्यानंतर दि. २४ डिसेंबर २०११ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केळसांगवी येथे मुख्याध्यापक पदी नियुक्ती झाली. तेथे दि. २४ डिसेंबर २०११ ते १७ जून २०१९ पर्यंत त्यांनी कामकाज पाहिले. त्यानंतर तेथून बदली प्राथमिक शाळा बिडसांगवी, ता. आष्टी, जि. बीड येथे झाली. दि. १८ जून २०१९ ते २३ जुलै २०२५ पर्यंत मुख्याध्यापक म्हणून येथे काम पाहिले. तद्नंतर २४ जुलै २०२५ ला गटशिक्षणाधिकारी, कार्यालय, पंचायत समिती, आष्टी येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती झाली. असा हा शैक्षणिक सेवेचा प्रवास नियतवयोमानानुसार दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी समाप्त झाला.

## शास्त्री विद्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी संपन्न

उदगीर (प्रतिनिधी)

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्ञानेश मातेकर ,स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासूणे, कु. सई राऊत प्रमुख पाहुण्या ज्योती शिंदे, अपूर्वा शेंडगे पर्यवेक्षक कृष्णा मारावार ,किरण नेमट माधव मठवाले,अभ्यास पूरक मंडळ प्रमुख अनिता यलमटे निलेश मांडवकर कार्यक्रम प्रमुख आशा गौतम व शैला सांगवीकर उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या ज्योती शिंदे यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा वेध घेतला.विद्यार्थिनी अपूर्वा शेंडगे हिने अण्णाभाऊ साठे यांनी दलित आणि उपेक्षित लोकांच्या हक्कासाठी लढा दिला ते थोर समाज सुधारक कवी आणि लेखक होते त्यांनी फकीरा, वैजयंता यासारख्या अनेक प्रसिद्ध साहित्यकृती निर्माण केल्या असे सांगितले.

यानंतर सायली देशमुख व तन्वी बोळेगावे ,सिद्धांत व वेदांत मोरखंडे या विद्यार्थिनींनी पोवाडा सादर केला . अध्यक्षीय समारोपामध्ये ज्ञानेश मातेकर यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या अलौकिक कार्यावर प्रकाश टाकला. विद्यार्थिनी सई राऊत हिने लोकमान्य टिळक हे प्रभावी वक्ते आणि पत्रकार होते. त्यांनी केसरी आणि मराठा ही वृत्तपत्रे सुरू केली त्यांनी स्वदेशी, बहिष्कार,राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य या चतु:सूत्रीचा पुरस्कार केला असे विचार व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साधना बजगीरे स्वागत व परिचय यशश्री चिद्रे व श्रावणी तेलंगे सूत्रसंचालन श्रुती मदने व चैतन्या कांबळे अपेक्षा जामकर या विद्यार्थिनींनी केले .कार्यक्रमाची सांगता कल्याण मंञाने झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी व सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीची नवोदयसाठी निवड

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यातील ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून ओळख असलेल्या मोहा येथील महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थ्यांनी कु.तेजस्विनी नीलकंठ सलगरे हिची नवोदय विद्यालयाकरिता निवड झाली आहे. महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन करत आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे. शाळेतील इयत्ता ९ वि वर्गात शिक्षण घेत असलेली कु.तेजस्विनी नीलकंठ सलगरे हिची नवोदय विद्यालयकरिता निवड झालेली



असून तेजस्विनी सलगरे ही इयत्ता ५ वि आणि ८ वि वर्गाची स्कालरशिप परीक्षा, ८ वि वर्गाची एनएमएमएस या सर्व स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेली आहे. या शैक्षणिक वर्षात शाळेतील दोन विद्यार्थिनी नवोदय विद्यालय प्रवेशकरिता पात्र झाल्या असून स्कालरशिप, एमटीएस, एनएमएमएस यासारख्या विविध स्पर्धा परीक्षेत शाळेतील असंख्य विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. कु.तेजस्विनी सलगरे हिच्या या यशाबद्दल तिच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव एड.अजय बुरांडे, सर्व संचालक मंडळ, शाळेचे प्राचार्य मुरलीधर बोराडे, शालेय प्रशासन, स्पर्धा परीक्षा विभागाचे सर्व सदस्य यांनी तिचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## डॉ.वसंतराव देशपांडे स्मृतीदिनी बरसल्या सुरांच्या धारा



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

संगीताच्या बागेतील ब्रम्हकमळ संगीतसूर्य स्व.डॉ.वसंतराव देशपांडे यांच्या पुण्यस्मृतीदिनी ३१ जुलै रोजी रात्री आयोजित संगीत सभेत सुरांच्या धारा बरसल्या संगीत सभेची सुरुवात अभियंता आनंद अरूणराव जोशी व प्रा. अतुल अरुणराव जोशी यांनी केली नंतर बी.के.पांडे,डॉ.अतुल कुंबेफळकर,सुचिता देशपांडे,युगंधरा जोशी, आनंद देशपांडे, राजदिप जोशी,राहुल देशपांडे आदींनी गायनाचे सादरीकरण केले.हार्मोनिअमवर बी.के.पांडे यांनी तर तबल्यावर रत्नदीप शिगे यांनी साथसंगत केली प्रारंभी राहूल देशपांडे यांनी प्रास्तविकातून स्मृती समितीच्या उपक्रमाची माहिती दिली.

## आष्टीचे भुमिपुत्र बजरंग बनसोडे यांची मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर नियुक्ती

आष्टी तालुक्यासाठी गौरवाची व अभिमानाची बाब

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील सुपुत्र व सध्या राष्ट्रीय तपास यंत्रणा (छ्ख-) दिल्ली येथे केंद्रीय प्रतिनियुक्तीवर असलेले अपर पोलीस अधीक्षक बजरंग बनसोडे यांची मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर गृह विभागाने गुरुवारी काढलेल्या आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांनी आजवर मिरज, अहिल्यानगर, नाशिक, नवी मुंबई इत्यादी ठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून यशस्वी पणे कामगिरी केली आहे. तसेच बुलढाणा येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी कारकीर्द गाजवली होती. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मोठे गुन्हे उघडकीस आणून पोलीस खात्याची मान उंचावेल अशी कामगिरी केली आहे. त्याची दखल घेऊन केंद्रीय गृह विभागाने त्यांना सन २०२२ मध्ये तीन वर्ष राष्ट्रीय तपास यंत्रणा (छ्ख-) मध्ये तीन वर्षे काम करण्याची संधी दिली होती. तिथेही आपल्या कार्याचा ठसा उमटवत देशसंरक्षणासाठी सर्वोच्च अशी कामगिरी केली आहे. त्यांनी अनेक ठिकाणी धाडसी कारवाया करून अट्टल गुन्हेगारांना जेलची हवा दाखवली आहे. त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी गौरविण्यात आले आहे. आता मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर गृह विभागाने जबाबदारी दिली आहे.

## परळीत दहशत माजविणारी मोठी टोळी अजूनही सक्रिय - खा.बजरंग सोनवणे

बीड/प्रतिनिधी


परळीत महादेव मुंडे यांची हत्या होते परंतु २१महिन्यात पोलीसांना आरोपी सापडत नाहीत आरोपी पोलीसांच्या नाकावर टिच्चून परळीत फिरतात.हे कोणाच्या आशीर्वादाने चालते.परळीत ज्याला मारले त्यांच्यावरच खोटे गुन्हे दाखल केले जातात,त्यांनाच जेल मध्ये टाकले जाते. परळीत दहशत माजविणारी अजूनही मोठी टोळी बाहेर सक्रीय असल्याचा आरोप खा.बजरंग सोनवणे यांनी केला.

बीड येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत महादेव मुंडे यांच्या कुटूबियांना न्याय देण्याच्या लढ्याचीदिशा ठरविण्यासाठी सर्व धर्मीय बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागर,आ.प्रकाश सोळंके,शिवसेना जिल्हाप्रमूख सचिन मुळूक,अनिल जगताप, बाळा बांगर,कुंडलिक खांडे,संतोष जाधव, हनुमान मुळीक,शेख शफीक,राजाभाऊ फड यांची उपस्थिती



होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले की,महाराष्ट्रात जिथे अन्याय होतो,तिथे मनोज जरांगे पाटील आणि जिथे पाटील तिथे आम्ही उभा आहोत.आज महादेव मुंडे यांची पत्नी आपल्या सर्वांची ही बहीण २१ महिन्या पासून न्याय मागत आहे.त्यांच्या मागणीचा कोणी विचारत नाही. आज काही खून समोर आले आहेत.परंतु त्यांच्या मारेकऱ्यांना अटक होत नाही.मग मुख्यमंत्री काय करतात परळीत तेच मारणार आणि तेच खोटे गुन्हे दाखल करत आहे. यामुळे कोणी तरी समोर येऊन बोलणे आवश्यक आहे.बाळा बांगर यांनी पुढे येऊन मांडणी केली आहे. काल मुख्यमंत्र्यांनी एसआयटी स्थापन केली पण त्याची ऑर्डर येईपर्यंत त्यांचे काही खरे मानू नका.एसआयटी मध्ये पंकज कुमावत आले तर दूध का दूध, पाणी का पाणी होईल. दरम्यान,कालपासून महादेव मुंडे प्रकरणात काही आरोपींना अटक झाल्याचे सांगितले जात आहे.परंतु कोणालाही अजून अटक झाली नाही.पोलीस यंत्रणाच अशी अफवा पसरवित असावी.परळीतील पोलीस गेंड्याचे कातडे पांघरून फिरत आहेत. केवळ पोलीसअधिक्षक आणि जिल्हाधिकारी बदलून चालणार नाही तर खालची यंत्रणा देखील बदलली पाहिजे आज सुद्धा परळीची टोळी सक्रिय आहे.जेल मध्ये देखील त्याना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.बीडचा खासदार म्हणून मी कायम या लढ्यात सोबत आहे.मनोज जरांगे पाटील हे देतील तो आदेश पाळून आम्ही काम करू

## रमी खेळणाऱ्या माणिकराव कोकाटेंचे डिमोशन



### माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा हेच समाधान

माणिकराव कोकाटे यांनी या आधीही शेतकऱ्यांबद्दल बोलताना अकलेचे तारे तोडले आहेत. विधानसभेत रमी खेळतानाही त्यांचा राजीनामा न घेता फक्त खातं बदललं. माणिकराव कोकाटे यांना फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचे काही गुपित माहिती आहे का असं विचारल राजू शेट्टींनीही या निर्णयावर टीका केली. माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेतला तरच महाराष्ट्राचं समाधान होईल असं शेट्टी म्हणाले.

### कृषी खात्याची जबाबदारी दत्तात्रय भरणेंकडे

मुंबई:विधानसभेत रमी खेळणाऱ्या माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषिखाते बदलण्यात आलं आहे. कृषिखात्याची जबाबदारी आता दत्तात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आलं आहे. तर भरणे यांच्याकडील आधी असलेलेय क्रीडा आणि युवक कल्याण खाते कोकाटे यांच्याकडे देण्यात आलं आहे. राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना मंत्री माणिकराव कोकाटे हे विधानसभेत मोबाईलवर रमी खेळत होते. त्याचा व्हिडीओ रोहित पवारांनी पोस्ट केला होता. त्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा द्यावा यासाठी विरोधकांनी सरकारवर दबाव टाकला होता.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

बीड ।प्रतिनिधी

श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी, ता. केज जि.बीड संचालित, गुरुनानक प्राथमिक विद्यालय, शाहूनगर, बीड येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १०५ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री गदळे आर. ए.आणि मुंडे एस. व्हि. हे लाभले.कार्यक्रमाच्या सुरवातीस मान्यवरांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे आणि बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन झाल्यास. विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यात इयत्ता सातवीचा चि.गदळे अनुष राजेश याने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक जीवनावर मुद्देसूद प्रकाश टाकला. यानंतर सृष्टी आंधळे, आदिरा पव्हने,अवंतिका वणवे,अनुजा स्वामी, कृष्णा वणवे ,संग्राम जाधव यांनी दोन्हीही महापुरुषांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त केली.त्यानंतर श्रीमती. मुंडे मॅडम यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवनातील विद्यार्थ्यासाठी एक प्रेरणादायी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले. तसेच गदळे सरांनी अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील कामगिरी विषद करीत ,एवढे मोलाचे योगदान असून सुद्धा त्यांच्या कार्याची हवी तितकी दखल घेतली गेली नाही त्याचं तितका सन्मान झाला नाही याची खंत व्यक्त केली. जी उपस्थिताना मनोमन भावली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती डोंगरे यू.एम.यांनी केले तर आभार श्री तांदळे ए. ए. यांनी मानले शेवटी माझी मैना गावावर राहिली ही प्रसिद्ध छक्कड ऐकवून कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीमती. हंगे मॅडम, श्रीमती. पव्हणे मॅडम, श्री ठोकरे सर यांनी प्रयत्न केले.

# एच पुर्व विभाग साचलेला कुंडीतील कचरा साफ करणार का

मुंबई । प्रविणभाऊ पवार

एच पुर्व महानगरपालिका सांताक्रूझ क्षेत्रातील खार पूर्व जवाहर नगर संत गाडगेबाबा मार्गावरील शांतीलाल कंपाऊंड साधम सुधा चाळ जवळ गेले अनेक दिवसांपासून महानगरपालिका घनकचरा विभागाची गाडी कचरा उचलण्यासाठी फिरकलीच नाही त्यामुळे येथील कचरा कुंडीतील कचऱ्याचा

ढिगारा साचला आहे.त्यामुळे येथे दुर्गंधी पसरत आहे. मच्छरचे प्रमाण वाढले आहे या परिसरातील आजूबाजूतील रहिवाशी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कुंडीतील कचरा हा रस्त्यावर पसरत चालला आहे.

यामुळे रोगराई होण्याचा संभव आहे. याच साचलेले कचऱ्याच्या



वाटेतून रहिवाशांना नाक मुठीत धरुन वाट काढत जावे लागते. स्थानिक नागरिक अक्षय घोडमोडे, मोहन जयस्वाल यांनी अनेक वेळा तक्रार करून ही महानगरपालिका कर्मचारी दखल घेत नाहीत. तेव्हा संबंधित महानगरपालिका अधिकारी व एच पुर्व वॉर्ड घनकचरा विभाग यांनी त्वरित या विभागातील कचरा उचलण्यासाठी आपले गाडी व कर्मचारी पाठवून कचरा उचलला व नागरिक या दुर्गंधी पासून मुक्त करून सहकार्य करावे.



# मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने पेपर विक्रेते ठोकळ सन्मानित

बीड ।प्रतिनिधी

शहरातील जुन्या पंचायत समिती कार्यालय समोर, नगर नाका येथे साहेबराव ठोकळ हे पेपर विक्री करत असून पावसापासून पेपर विक्री संरक्षणासाठी त्यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दि.१ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी मातृभूमी प्रतिष्ठान च्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी पेपर विक्रेते साहेबराव ठोकळ यांना पुष्प हार, सन्मानपत्र व एक मोठी व एक छोटी छत्री तसेच पेपर झाकण्यासाठी मोठी प्लास्टिक कॅरी बॅग भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिवम बुक स्टॉल अँड न्युज पेपर एजन्सी चे संचालक तथा वृत्तपत्र विक्रेता संघाचे जिल्हाध्यक्ष सुमुर्ती वाघीरे, शेतकरी कामगार पक्षाचे राज्य मध्यवर्ती समितीचे सदस्य बाळासाहेब घुमरे,लेक लाडकी अभियान जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, लक्ष्मण चाटे,अमोल गाडेकर, रफिक भाई तांबोळी आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करुन गुरु आनंदच्या भगीनींनी आण्णाभाऊंची जयंती साजरी केली - सौ. जयश्री विधाते

बीड /प्रतिनिधी

आज लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आणि प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जि. प. प्राथमिक शाळा पोलीस कॉलनी बीड येथे मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मैनाताई बोराडे माजी उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड. तसेच प्रमुख अतिथी म्हणून बीड नगरपालिकेच्या माजी सभापती तथा नगरसेविका सौ जयश्रीताई विलास विधाते शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्रजी खेडकरसर, केंद्र प्रमुख लक्ष्मीकांतजी अवढाळसर, साधनव्यक्ती पंचायत समिती बीड ऊषाताई लोंढे, एकल महिला संघटनेच्या रुक्मिणीताई नागापुरे, राखीव दलाचे. पो. निरीक्षक पोलीस मुख्यालय बीड पी पी दलाईसर, दै. वादळवार्ताचे कार्यकारी संपादक बालाजी जगतकरसर, दैनिक दिव्य लोक भूमीचे केशवजी मुंडेसर संपादक युवा दर्पण लाईव्ह चे राजेंद्रजी तिडकेसर, संतोषजी जायभायसर,सविताताई जैन, मुख्याध्यापक सुमितजी जोगदंडसर, कार्यक्रमाच्या आयोजक समाजसेविका सीमाताई ओस्तवाल यांची उपस्थिती लाभली होती.या कार्यक्रमाच्या




प्रास्ताविकात खवचटसर यांनी शाळा आणि सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून आजवर राबवण्यात आलेल्या उपक्रमांचा ओघवता आढावा घेतला. तर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी सभापती तथा नगरसेविका जयश्रीताई विलास विधाते यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत पौराणिक काळ ते स्वातंत्र्यपूर्व काळात स्पृश्य अस्पृश्यतेच्या जोखडात अडकलेला एकलव्याला धनुर्विद्या नाकारणारा गुरु द्रोणाचार्य तर स्वातंत्र्यपूर्व काळात स्पृश्य अस्पृश्यतेची जाणीव करुन देत छडी फेकुन मारणारा शिक्षक ते आज प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा अधिकार आहे आणि तो त्यांना मिळवून देण्यासाठी तांडा वाडी वस्ती झोपडपट्टी ते गावकुसाबाहेर शाळा प्रवेशासाठी उपेक्षित वंचीत दीन दुबळ्याच्या लेकरांना प्रेरित करणारा जि. प. चा आजचा शिक्षक हे परिवर्तन म्हणजे बदल घालून घाव, सांगून गेले मज भीमराव. या आण्णाभाऊंच्या लेखणीची ताकद आहे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या आयोजक समाजसेविका सीमाताई ओस्तवाल यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधत त्यांना बोलक केल. मोबाईल पासुन दुर रहा, चांगला अभ्यास करा. आणि मोठे व्हा. आपली ओळख आपल्या कामाच्या माध्यमातून झाली पाहिजे असे काम करा अशा शुभेच्छा दिल्या. ऊषाताई लोंढे यांनी प्रत्येक शाळेत महापुरुषांचे फोटो असायला पाहिजेत त्याच बरोबर प्रत्येक महापुरुषाची जयंती साजरी केली पाहीजे. त्यांचे जीवन चरित्र विद्यार्थ्यांना उलगडून सांगीतले पाहिजे अशी आपेक्षा व्यक्त केली. मैनाताई बोराडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शाळेला ई क्लास रुम मिळावी यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली.

या कार्यक्रमात कें. प्रा. शाळा पोलीस कॉलनी, कें. प्रा. शाळा इंदिरानगर, कें. प्रा. शाळा धोंडीपुरा. कें. प्रा. शाळा शाहु नगर बीड या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल, ईरेझर, शार्पनर अशा शैक्षणिक साहित्य वाटण्यात आले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बालमित्र मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. प्रमुख उपस्थितीत माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, बाळकृष्ण थोरात हे मान्यवर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सेवा सोसायटी चेअरमन



रविंद्र निर्मळ यांनी तर आभार प्रदर्शन औदुंबर थोरात यांनी केले.

कार्यक्रमास दामोदर थोरात,समीर शेख, सुरेश निर्मळ, बाळकृष्ण मुळे, विक्रांत वाणी, औदुंबर नाईकवाडे, अजय थोरात,दादा गायकवाड, अशोक जाधव ,जीवन मुळे, विठ्ठल कदम, तुकाराम गायकवाड आदी. ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते नविन पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

अण्णाभाऊ साठे सार्वजनिक उत्सव समिती गठित करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांची निवड याप्रमाणे करण्यात आली.अध्यक्ष: बापू थोरात, उपाध्यक्ष: राजेंद्र थोरात,सचिव: अशोक थोरात, कोषाध्यक्ष: नितीन थोरात,सल्लागार: अनिल थोरात,सदस्य म्हणून औदुंबर थोरात, बालु थोरात, तुळशीराम पवार, संतोष थोरात, कृष्णा थोरात, गणेश थोरात, रमेश थोरात, बन्सी निर्मळ आदींची निवड झाली.



**बीड - साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्ताने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक बीड शहर या ठिकाणी जाऊन अभिवादन करतांना भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे यांच्या सह मान्यवर.यावेळी भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय या ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे सर्व जिल्हा व शहर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# एकाकी जीवनाचा करुण अंत

बीड - समाजाने एकोप्याने राहावे, एकत्रित राहावे आणि समुहाने राहावे ही पुर्वी पासुन चालत आलेली संकल्पना, परंतु एकविसावे शतक सुरू झाले आणि ज्ञान तसेच तंत्रज्ञानाचा स्फोट झाला. अनेक पिढ्या जगत असलेले जीवन कुठेतरी विस्कळीत होऊ पाहताना दिसले. पाश्चात संस्कृती भारतीयांच्या आचारात, विचारात आणि वागण्यात दिसू लागली.

परिणामतः समाजातील एकत्रित कुटुंब शहराकडे धाव घेऊ लागले. कोणी रोजगारासाठी, शिक्षणासाठी तर कोणी राहण्यासाठी, विकासासाठी अश्या अनेक कारणांसाठी. त्यामुळे कुटुंब विभक्त होऊ लागली, तरुण पिढी प्रगतीच्या दिशेने शहराकडे गेली मात्र मागे राहिली ती वृद्ध पिढी आणि विचारसरणी. मग त्याचं कोणी वाली राहत नाही. मुलं एकदा शहरात गेली की शहरांचीच होऊन जातात. ना त्यांना कुठली माणुसकी, ना कुठली जबाबदारी. ते केवळ जगण्याची शर्यत जगतात. दुसरीकडे अश्या वृद्ध व्यक्ती



एकाकी पडतात उदरनिर्वाह कोणी देत नसल्याने भीक मागतात किंवा मग वृद्ध आश्रमात जाऊन राहतात. किती ती दयनीय अवस्था होत असेल विचार कारणही नकोस वाटत पण त्या व्यक्ती ते जीवन प्रत्यक्षात जगतात व जगत आहेत. आज सकाळीच अशीच अप्रिय घटना नजरेस पडली. व हे सगळे विचार डोक्यात येऊन गेले. ठिकाण होते जिल्हा रुग्णालय. या ठिकाणी या आजी मरण पावल्या परंतु यांना बघायला ही कोणी नाही आले. त्याच सर्व जीवन एकाकी गेल, वृद्धत्व भीक मागण्यात आणि शेवटी मरणाच्या दारातही कोणीच जवळ नाही. एवढ्या हाल-अपेष्टानी जीवन जाणे म्हणजे ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. शेवटी जिव्हाळा अनाथ बेघर निवारा केंद्रातील लोकांनी यांचा अंत्यविधी पार पाडला. खरंच याला प्रगती म्हणावी का ? का आपल्या माणूसपणाची अधोगती ? प्रश्न मनाला खाऊन गेले पण हेच सत्य होते आणि हे आपल्याला स्वीकारावेच लागेल.

जर भविष्यात ही परिस्थिती उद्भवू द्यायची नसेल तर आजपासून विचार करावा लागेल की, आपण किती तंत्रज्ञानाच्या आहारी जायचं का ?आपली संस्कृती टिकवायची आणि त्यादिशेने कुठली वाटचाल करता येईल. नाहीतर आपलाही भविष्यात असाच एकाकी करुण अंत निश्चित आहे.

संपर्क: ९७६४२२३५३४

# क्रूर सावकाराचा जामीन जिल्हा न्यायालयाने फेटाळला

## सावकार जाधवचा मुक्काम आता कोठडीतच

बीड ।प्रतिनिधी

पिडित फटाले कुटुंबीयांना न्यायालयाचा दिलासा खाजगी सावकार डॉ. लक्ष्मण जाधव याचा जामीन आदरणीय जि. न्यायालयाकडुन फेटाळण्यात आला आहे. पेठ बीड भागातील रहिवासी मयत राम फटाले हे खाजगी सावकारकीच्या फासात अडकले होते, खाजगी सावकार डॉक्टर लक्ष्मण जाधव यांचे कडून त्यांनी कुटुंबीयांच्या गरजा भागविण्याकामी खाजगी कर्ज उचलले होते ज्याची परतफेड व व्याज अदा करूनही त्यांना खाजगी सावकार डॉक्टर लक्ष्मण जाधव हे एनकेन प्रकारे त्रास देत होते. आणखी पैशाची मागणीचा तगादा लावत होते, शेवटी राम फटाले यांचे कडे पैसे नसल्याने ते हवालदिल झाले.यातच आरोपी लक्ष्मण जाधव यांनी राम याचेवर मानसिक दबाव आणून जर तुझ्याने व्याजाचे पैसे देणे होत नसेल तर तुझ्या पत्नीला माझ्याकडे आणून सोड अशा प्रकारचा गलिच्छ प्रकार केल्यामुळे मयत राम फटाले हे मानसिक दबावाखाली आले व यातच त्यांनी आपली जीवन यात्रा संपवली. त्यांनी गळफास घेतला यास कारणीभूत असलेले व सत्ताधारी पक्षाच्या संघटनेचे पदाधिकारी असलेले खाजगी सावकार डॉक्टर लक्ष्मण जाधव यांना अटक झाल्यानंतर त्यांची रवानगी जिल्हा कारागृह बीड येथे करण्यात आली.



त्यानंतर त्यांनी जामीन मिळणे कामी मा. सत्र न्यायालय बीड येथे त्यांचा जामीन अर्ज मांडला होता. या मध्ये फिर्यादी पक्ष व आरोपी पक्ष यांच्या वतीने जोरदार युक्तिवाद करण्यात आला. सदर सुनावणीनंतर न्यायालयाने खाजगी सावकार आरोपी लक्ष्मण जाधव याचा जामीन अर्ज तडकाफडकी फेटाळला. त्यामुळे फटाले कुटुंबीयांना न्यायालयाने फार मोठा दिलासा दिल्याचे बोलले जात आहे.या प्रकरणात फिर्यादी पक्षाच्या वतीने बीड शहर बचाव मंचचे मुख्य कायदेशीर सल्लागार ड.अनिल बारगजे यांनी कागदपत्रांसह जोरदार युक्तिवाद केला. तसेच सरकार पक्षातर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील सरवदे साहेब यांनी देखील भक्कम बाजू मांडली. या आधारे सर्व पडताळणी करून मा. न्यायालयाने आरोपी लक्ष्मण जाधव याचा अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे आरोपीच्या तुरुंगातून बाहेर पडण्याच्या स्वप्नावर विरजण पडले आहे. तसेच शहरात खाजगी सावकारकीचा व्यवसाय करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.बीड शहर बचाव मंचाचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डीजे तांदळे सर, अध्यक्ष नितीन जायभाये, ड. नितीन वाघमारे आदि सर्व पदाधिकाऱ्यांनीड. अनिल बारगजे यांचे मनःपूर्वक



बीड - साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिवादन केले, यावेळी मीराताई नवले, रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, राजाभाऊ हुरकुडे सह मान्यवर उपस्थित होते.

# समग्र शिक्षा अभियान व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम संपंन

बीड ।प्रतिनिधी

समग्र शिक्षा अभियान व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमानाने समावेशित शिक्षण विभाग गटसाधन केंद्र बीड यांच्यावतीने दिनांक ३१.०७.२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड या ठिकाणी वाचादोष असणाऱ्या २९ शालेय विद्यार्थ्यांवर एकाच दिवशी शस्त्रक्रिया करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हा शल्यचिकित्सक व बीड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी खान समंदर हमीद यांनी विशेष तयारी केली होती.




शालेय आरोग्य तपासणीतून व विशेष शिक्षक यांच्या शाळा भेटीतून सुमारे ७० मुले या कॅमसाठी रेफर करण्यात आली होती. त्यांची पूर्व तपासणी केली असता त्यापैकी २९ विद्यार्थ्यांना टंग टायची शस्त्रक्रिया आवश्यक असल्याचे निदर्शनास आले व तात्काळ त्या विद्यार्थ्यांवर यशस्वी शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात आली. सदर शिबिर यशस्वी करण्याकरता गटसाधन केंद्र बीड चे सर्व समावेशित साधन व्यक्ती, विशेष शिक्षक व आर.बी.एस.के ची संपूर्ण टीम यांनी अथक परिश्रम घेतले.

गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांची आय ई सेंटरला भेट

बीड तालुक्याचे कर्तव्यदक्ष गट शिक्षण अधिकारी समंदर खान साहेब पंचायत समिती बीड आज जिल्हा रुग्णालय बीड झालेल्या ढजछत्रग्नए ढखए शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची आपल्या खूप व्यस्त शेड्युल मधून भेट दिली आणि पालकांना तसेच विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. तरी खए विभाग तालुका बीडच्या वतीने साहेबांच खूप खूप आभार .




बीड (प्रतिनिधी)

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी अभिवादन केले.शहरातील अर्धाकृती पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी नगरसेवक गणेश वाघमारे, विनोद हातागळे, गोपाळ धांडे, अमोल पौळ, स्वप्नील हातागळे, प्रकाश कानगावकर, अमर विद्यागार, नाना मस्के, संगीताताई वाघमारे, मुन्ना गायकवाड, संजय वाघमारे, पांडुरंग सुतार, विशाल मोरे आदी उपस्थित होते. तसेच, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरातील रामतीर्थ परिसरातील अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी गोरख मोमीन, विशाल बोबडे, सागर पाटोळे, निलेश लोंढे, नितीन आरे, विजय रोकडे, अशोक धुताडमाल, संगीता बाबरे, संजीवणी कानडे, संगीता कांबळे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.



## आम आदमी पार्टीच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

बीड ।प्रतिनिधी

जगाला शिकवण देणारे पृथ्वी ही शेषनागाच्या पानावर तरत नसून कष्टकऱ्यांच्या कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या कष्टावर तरते अशी जगाला शिकवण देणारे साहित्यरत्नं आण्णा भाऊ साठे यांना आम आदमी पार्टीच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे, जिल्हा कोषाध्यक्ष कैलास चंद पालीवाल, जिल्हा बॉडी सदस्य ज्ञानेश्वर माऊली शिंदे, शहर अध्यक्ष सय्यद सादेक, तालुका अध्यक्ष कृष्णा पंडित, कृष्णा जगताप, शहर सचिव मिलिंद पाळणे इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धोपटेश्र्वर येथे अण्णा भाऊ साठे जयंती साजरी



बदनापूर ।प्रतिनिधी

जिल्हापरिषद प्राथमिक शाळा धोपटेश्र्वर या ठिकाणी साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जंयती निमित्त निमित्त शाळेमध्ये वृक्षारोपण करून जयंती साजरी करण्यात आली या वेळी गावचे सरपंच ताराचंद फुलमाळी,उपसरपंच नंदू भाऊ दाभाडे, वंचित बहुजन आघाडी चे तालुका महासचिव बदनापूर दीपक खजेकर, व जिल्हा परीषद शाळेचे मुख्याध्यापक, श्री कुलथे पि. ए.स.श्री.नाईकवाडे बी.एस.श्री हिवाळे पी.बी.श्रीमती दांडगे एल.एन.श्री.आघम के.एस श्री.मुंढे व्ही.ए. श्रीमती गोंडे डी.जी.श्रीमती पठारे ए.के भास्कर खाजेकर, भानुदास खाजेकर, दावीद खाजेकर संजय फुलमाळी,आशिष खाजेकर, शिवाजी साळवे, गौतम हिवराळे, आशिष खाजेकर दयानंद जगधने,पवन हिवराळे उमेश खाजेकर सर्व समाज बांधव व गावकरी मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# मुलांच्या जि.प.माध्यमिक शाळेत योग शिबीर संपन्न

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

पतंजली योग समिती अंबाजोगाई व जिल्हा परिषद माध्यमिक मुलांची शाळा अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी योग शिबिराचे आयोजन शाळेतील मुख्याध्यापक श्री. तांदळे संजयकुमार नरसिंगराव यांनी दिनांक १/८/ २०२५ रोजी केले होते.

योग शिबिर मध्ये योग प्रशिक्षक तथा प्राकृतिक चिकित्सक श्री. दत्ता लांब यांनी विद्यार्थ्यांना योग प्रात्यक्षिक सह दैनंदिन जीवनातील धावपळ, ताण-तणाव, विपरीत खानपान, आरोग्याकडे दुर्लक्ष, योग्य आहार, योग्य उपचार, व्यायाम आणि योग, आयुर्वेद, सांस्कृतिक चिकित्सा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले तसेच योग शिक्षणाद्वारे आजाराविषयी समज/गैरसमज याबाबत उत्कृष्ट माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आवडीने योग प्रात्यक्षिक मध्ये स्वतः सहभाग घेतला. शाळेच्या वतीने मुख्याध्यापक श्री. तांदळे संजयकुमार यांनी योग प्रशिक्षक श्री. दत्ता लांब यांचा सत्कार केला तर सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती वैशाली आकुसकर यांनी आभार मानले. बेसिक प्रॅक्टीस स्कूल व जिल्हा परिषद मुलांची शाळा छत्रपती शिवाजी महाराज चौक अंबेजोगाईतील शाळेतील सर्व स्टाफ व विद्यार्थी याप्रसंगी सदर शिबिरास उपस्थित होता.





माजलगाव :-येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व महसूल दिन साजरा करण्यात आला.यावेळी प्रभारी सह दुय्यम निबंधक गणेश चौधरी,विनोद मुनेश्वर, नामदेव लटपटे,भारत कसबे, सिद्धेश्वर बोबडे व पत्रकार रविंद्र राऊत.



तलवाडा -लोकशाहीर,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या जयंती निमित्ताने त्वरितापुरी कला व विज्ञान महाविद्यालय तलवाडा या ठिकाणी अभिवादन केले.यावेळी त्वरितापुरी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य अँड सुरेशराव हात्ते साहेब .समवेत पत्रकार बांधव व प्राध्यापक आणि विद्यार्थी....

# बीड जिल्हा बँकेच्या सभासदांनी एकरक्कमी कर्ज परतफेड

## योजनेचा लाभ ३० सप्टेंबर पूर्वी घ्यावा - विवेक जॉन्सन,अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी

बीड ।प्रतिनिधी

दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. बीड बँकेने लागु केलेल्या एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेची अंतीम मुदत दि.३०.०९.२०२५ असून सदरील मुदतीनंतर ही योजना संपुष्टात येणार आहे. सदर योजनेत सहभाग नोंदविण्यासाठी आपण यापूर्वी रक्कमेचा भरणा करून भाग घेतला असल्यास आपण दि.३०.०९.२०२५ पर्यंत उर्वरीत रक्कमेचा भरणा करण्यात यावा. रक्कमेचा मुदतीत भरणा न झाल्यास आपण योजनेत सहभाग घेणेसाठी भरणा केलेली रक्कम आपल्या थकीत संस्थेच्या /थकबाकीदाराच्या थकीत व्याजात जमा करण्यात येवुन आपला एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत योजनेतील सहभाग संपुष्टात येणार आहे.तरी आपण आपल्या संस्थेकडील/वैयक्तिक बँकेचे एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत दि. ३०.०९.२०२५ पूर्वी भरणा करून घेवून बेबाकी घेण्यात यावे असे मा.प्राधिकृत अधिकारी समितीची सभा दि.३१.०७.२०२५ रोजीच्या सभेमध्ये जिल्ह्यातील सर्व थकबाकीदार संस्था/ सभासदांना श्री.विवेक जॉन्सन बँकेचे प्राधिकृत अधिकारी समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी बीड तसेच सतीश तोटावार प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, सतीश पोकळे प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य तथा जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था बीड, अशोक कदम प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड, अॅड.अशोक कवडे प्राधिकृत अधिकारी समितीचे सदस्य तथा जेष्ठ विधीज्ञ जिल्हा न्यायालय अंबाजोगाई व शरद ठोंबरे बँकेचे प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आवाहन

# महिला आर्थिक विकास महामंडळाचा अधिकारी चर.. चरला; संजय गर्जे कोणाचा जावई?

## महिलांचे शोषण अन् पाच कोटींचा घोटाळा । देवेंद्रजी, एकट्या नगर तालुक्यात १२ हजार महिलांना गंडवले । अनेक महिलांचे शोषण करणारा संजय गर्जे कोणाचा जावई?

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरण धोरणांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून महिला बचत गटांना आर्थिक मदत करणे, त्यांना सक्षम करण्यासह महिलांना रोजगाराच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम राबवणे, त्यांच्यासाठी उद्योग व्यवसाय सुरू करण्यासाठी महामंडळ स्तरावर राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या अनुषंगाने साधन केंद्रांना सक्षम करण्याची योजना आहे. नगरमध्ये मात्र याच्या उलट घडले आहे. महिलांपेक्षा या बचतगटांवर नियंत्रण आणि समन्वय ठेवण्यासाठी महामंडळाने नियुक्त केलेला समन्वय अधिकारी संजय गर्जे याने तब्बल पाच कोटी रुपयांना महामंडळ आणि महिलांना गंडवल्याचा प्रकार समोर आला आहे. हे सारे करताना त्याने अनेक महिलांचे शोषण केले असून त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी कर्तुत्ववान लोक संचलित साधन केंद्राच्या सिंधू वाणी यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे केली आहे.

**बारा हजार महिलांचे कोट्यवधी लाटले!**

नगर तालुक्यात १२०० बचत गट कार्यरत आहेत आणि या बचत गटांच्या माध्यमातून जवळपास १२ हजार महिला कार्यरत आहेत. या महिलांना महिला आर्थिक विकास महामंडळाकडून अनेक योजना आणि अनुदान दिले जाते. नगर तालुक्यासाठी साधन केंद्र म्हणून काम करत आहे. आम्ही कर्तुत्ववान लोक संचलित साधन केंद्र चालवत असून या साधन केंद्राच्या माध्यमातून काम करत असताना नगरचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय गर्जे यांच्याशी ओळख झाली. त्यांनी काम करत असताना महिलांचे शोषण केले आणि त्याबाबत वेळोवेळी तक्रारीही झाल्या. गर्जे यांनी अनेक महिलांना त्रास दिला असून त्यांच्याकडून महिलांचे शोषण झाले आहे. मात्र, महिला बदनामीच्या भितीने पुढे यायला तयार नाहीत. मात्र, त्याच्यावर कारवाई व्हावी अशी मागणी सौ. सिंधू वाणी यांनी केली आहे.

संजय गर्जे महिलांना म्हणतो, शर्टचे बटन वरती घेतले तर मी गुंडा. माझे पाथडित दारूचे दुकान!

संजय गर्जे हा कार्यालयात असताना आणि बाहेर बचत गटांना भेटी देताना अतिशय उर्मट आणि दादागिरीची भाषा वापरतो. माझ्या शर्टच्या बाहीचे मनगटापर्यंतचे बटन बंद असेल तर मी साहेब, आणि हेच बटन वरती घेतले तर मी गुंडा. माझे पाथडीत दारुचे दुकान आहे, माझे कोणीच वाकडे करु शकत नाही, अशी धमकीची भाषा त्याने अनेक महिलांना वापरली आहे. त्याच्याकडून अनेक महिलांचे शोषण झाले असून त्याच्या गुंडप्रवृत्तीमुळे कोणी त्याच्या विरोधात बोलायला तयार नाही. त्यामुळे या गर्जेच्या विरोधात महिलांचे शोषण आणि महिलांना धमकावल्याप्रकरणी गुन्हा नोंदवावा अशी मागणीही सौ. वाणी यांनी केली आहे.

पोलिसांनी जबाब नोंदवून कसे काय सोडले?

गर्जे याच्याबाबत अनेक गंभीर तक्रारी असताना व त्याबाबत सविस्तर माहिती दिल्यानंतर पोलिस अधीक्षकांनी सदरबाबत तोफखाना पोलिसांना चौकशीचे आदेश दिले. तोफखाना पोलिसांनी गर्जे याचा जबाब नोंदवला आणि त्याला सोडून दिले. खरेतर आमच्या तक्रारीत अनेक गंभीर मुद्दे असतानाही पोलिसांनी सखोल चौकशी करण्याचे सोडून त्याला सोडून कसे दिले असा प्रश्नही सौ. वाणी यांनी उपस्थित केला आहे.

**रक्षाबंधन होताच करणार उपोषण!**

नगरमध्ये जिल्हा समन्वय अधिकारी असताना संजय गर्जे आणि त्याच्या कृष्णकृत्याला साथ देणारी शामल कोचीवाड या दोघांच्या विरोधात तातडीने कारवाई करावी अन्यथा रक्षाबंधन संपताच नगरमधील महिला बचत गटाच्या महिला पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर सोमवार, दि. ११ ऑगस्टपासून अमरण उपोषणाला बसू असा इशारा देण्यात आला आहे.

**बदली ठाण्याला तरीही नगरवर वॉच!**

गर्जे याची बदली ठाणे जिल्ह्यात करण्यात आलेली असतानाही त्याचा वॉच नगरमधील कार्यालयावर कसा काय असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. त्याच्या मोबाईलवर नगरच्या कार्यालयाचे सीसीटीव्ही कनेक्शन कशासाठी यासह ठाण्यात बसून रात्रंदिवस नगरच्या कार्यालयात कोण येते

# अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणार; आ. संग्राम जगताप

## राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने अभिवादन

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

महाराष्ट्रात होऊन गेलेल्या महापुरुषांच्या विचारांची दिशा देशाला मिळत आहे. महापुरुषांचे विचार व कार्य चालू ठेवण्यासाठी त्यांच्या कार्यास योगदान दिल्यास त्यांना खरे अभिवादन ठरणार आहे. अण्णाभाऊ साठे यांचे पदस्पर्श ऐतिहासिक नगर शहराला लाभले. लवकरच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा देखील उभारण्यात येणार असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

सिद्धार्थ नगर येथे राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना आमदार संग्राम जगताप, मनपा आयुक्त यशवंत डांगे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे सुरेश बनसोडे, अंकुश मोहिते, अजय पठारे, अजित वाघमारे, जय भोसले, मनीष साठे, पोपट पाथरे, आकाश आवटी, नामदेव चांदणे, काशिनाथ सुलाखे, विजय वडागळे, राजू घोरपडे, गुलाब गाडे, सुनील सकट, सनी लोखंडे, कौशल गायकवाड, विशाल भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साहित्य, शाहिरी च्या माध्यमातून लोक चळवळ निर्माण केली व वाडी, वस्ती, शहरी भागात जनजागृती करत समाज प्रबोधन केले. लोकांमधून त्यांना लोकशाहीर ही पदवी भेटली. महाराष्ट्रात अनेक महापुरुष होऊन गेलेले असून त्यांची विचाराची दिशा ही देशाला मिळालेली आहे.अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी देखील आपल्या मनोगतातून अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या जीवनावर व त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांवर उजाळा देउन त्यांच्या संघर्षाला व योगदानाला स्मरण ठेवून प्रत्येकाने सामाजिक योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले. यावेळी महापुरुषांचा जयघोष करुन त्यांना उपस्थितांनी अभिवादन केले

# सामाजिक न्याय एकता रॅलीद्वारे अण्णा भाऊ साठेंची १०५ वी जयंती साजरी

पूर्णा (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, सामाजिक न्याय विभागाच्या यांच्या वतीने साहित्यिक सम्राट, लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती सामाजिक न्याय व एकता रॅलीच्या माध्यमातून दिनांक १ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.या रॅलीचे उद्घाटन रचना भालेराव व आशा हटकर यांच्या हस्ते करण्यात आले. सकाळी १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथून रॅलीची सुरुवात झाली. रॅली दरम्यान सिद्धार्थ नगर, रेल्वे क्वार्टर, विजयनगर, कुरेशी मोहल्ला मार्गे मार्गक्रमण करताना छ. शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.



रॅलीचे विसर्जन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. घोडे सर होते, तर सूत्रसंचालन लक्ष्मीकांत शिंदे यांनी केले. उद्घाटक म्हणून चक्रवर्ती वाघमारे यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमास रेखाताई कांबळे, उज्वलाताई गायकवाड, मीना तेजाड, आनंद दीपक, गोविंद गजभारे, किशोर धुळे, सुदाम वाघमारे, अंबादास डोंगरे, भागुजी गायकवाड, प्यारे मोहन, सखाराम गायकवाड, बसवंते यांच्यासह इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते आणि त्यांनी रॅली यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

स्वा.बाळासाहेब ठाकरे स्वच्छ - सुंदर अभियानांतर्गत

# तलवाडा बस स्थानकाची स्वच्छता समितीकडून पाहाणी

तलवाडा ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील बस स्थानकाची स्वच्छता बाबतची धाराशिव यांच्या समिती मार्फत दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी तपासणी करण्यात आली. हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छता मोहिमेअंतर्गत तलवाडा बस स्थानकाची स्वच्छतेबाबतची तपासणी मोहीम राबविण्यात आली.या तपासणी समितीमध्ये उप महाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्रमांक २ धारसिव यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी करण्यात आली या बस स्थानक स्वच्छता, प्रवाशांना पिण्याचे पाण्याचा व्यवस्था , त्याचबरोबर गाड्यांची पार्किंग , सुलभ शौचालय, बस स्थानकाची रंगरंगोटी आदी बाबी तपासण्यात. आल्या. या नियंत्रण समितीमध्ये धाराशिव विभागाचे यंत्र अभियंता




सूर्यकांत थोरबोले, विभागीय कामगार अधिकारी प्रदीप सुतार, गेवराई आगार प्रमुख एल बी मस्के, गेवराई साहाय्यक वाहतूक अधीक्षक तु, जे, गेवराई तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी पत्रकार हल्ला कृती समितीचे समन्वयक तालुका अध्यक्ष तथा तलवाडा येथील पत्रकार आल्ताफ कुरेशी, यांनी बस स्थानक परिसरातील काही समस्या समोर मांडले होते समस्याचे आम्ही पाठपुरावा करू असे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून बोलण्यात आले यावेळी प्रवासी मित्र अभिजीत मरकड, उपस्थित होते तर यावेळी समितीने सर्व परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी सह आदी प्रवासी उपस्थित होते

# महसूल सप्ताहाच्या माध्यमातून लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी - पालकमंत्री मेघना बोर्डीकर

परभणी (प्रतिनिधी)

महसूल सप्ताहाच्या माध्यमातून शासनाच्या लोककल्याणकारी योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून द्यावा. तसेच परभणी जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्न करुयात, असे आवाहन जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी महसूल सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

महसूल दिनानिमित्त वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या सभागृहात आज जिल्हा प्रशासनाच्यावतीने कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, महापालिका आयुक्त धैर्यशील जाधव, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, अनिता भालेराव, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, जीवराज डापकर, संगीता चव्हाण, शैलेश लाहोटी, तहसिलदार डॉ. संदीप राजापुरे एनआयसीचे देवेंद्रसिंह आदींसह महसूल विभागाचे अधिकारी, कमर्चारी उपस्थित होते.

पालकमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, महसूल विभागामार्फत दि. १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून नागरिकांसाठी विविध लोकोपयोगी उपक्रम




राबविण्यात येणार आहेत. आपल्या जिल्ह्यात हा सप्ताह प्रभावीपणे राबवून सर्वसामान्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून द्यावा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत तर त्याच धर्तीवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकसित महाराष्ट्र-२०४७ चे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमात आपण सर्वजण सहभागी होवूयात आणि देश व राज्यासह आपल्या परभणी जिल्ह्याला विकासात अग्रेसर करुयात. महसूल कर्मचाऱ्यांना आपल्या नोकरीच्या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा करण्याची उत्तम संधी मिळाली आहे, या संधीचा लाभ घेऊन कर्मचाऱ्यांनी तळागाळातील लोकांपर्यंत शासनाचे लोककल्याणकारी उपक्रम पोहोचवून त्यांना योजनांचा लाभ द्यावा. तसेच मुख्यमंत्री यांनी दिलेल्या दीडशे दिवसांच्या कार्यक्रमाची जिल्ह्यात यशस्वीपणे अंमलबजावणी करावी, असे आवाहनही पालकमंत्री यांनी यावेळी केले.जिल्हाधिकरी रघुनाथ गावडे यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना महसूल दिनाच्या शुभेच्छा देत महसूल सप्ताह यशस्वीपणे राबविण्याचे आवाहन केले. श्रीमती ढालकरी यांनी प्रास्ताविकात जिल्हा प्रशासनाने मागील वर्षात केलेल्या यशस्वी कामांचा लेखाजोखा मांडला व महसूल सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.यावेळी महसूल विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी, उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी आणि गुणवंत पाल्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# बालमटाकळीतील अखंड हरिनाम शताब्दी महोत्सवाची जय्यत तयारी

अहिल्यानगर/ प्रशांत बाफना जिल्हा प्रतिनिधी

शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथे गोपाळ कृष्ण जयंती उत्सवानिमित्त प्रत्येक वर्षी सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास चालू वर्षी १०० पूर्ण होत असल्याने सर्व गावकऱ्यांनी अनेक महिन्यापासून एकत्र येत शताब्दी महोत्सव निमित्त मोठा सोहळा आयोजित केला असून या भव्य सोहळ्याचे निमंत्रण राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांचेसह विधान परिषदेचे सभापती राम शिंदे ,पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील , पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे,खा. निलेश लंके, आ.मोनिकाताई राजळे, आ. विठ्ठलराव लघें, माजी खा. डॉ.सुजय विखे ,माजी आ.नरेंद्र घुले,चंद्रशेखर घुले,पांडुरंग अभंग , ड प्रताप ढाकणे ,अरुण मुंढे ,हर्षदाताई काकडे ,डॉ. क्षितिज घुले यांचेसह संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांना निमंत्रित करण्यात आले असलेबाबतची माहिती आयोजकांनी दिली आहे. या बाबत अधिक माहिती देताना सांगितले आहे की , सन १९२६ मध्ये श्री संत भगवान बाबांनी गोपाळ कृष्ण जयंती उत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात केली होती .त्यानंतर तीच परंपरा वै गुरूवर्य भीमसिंह महाराजांनीही पुढे अखंडित ठेऊन सन२०००मध्ये अमृत महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला होता . त्यामुळे गावातील जुन्या पिढीतील सांप्रदायिक मंडळींनी पुढे सुरू ठेवलेल्या या पंपरेला आता या वर्षी १०० वर्ष पूर्ण होत असल्याने हा सोहळा येत्या ९ ऑगस्ट पासून सुरू होत असून १६ ऑगस्ट रोजी त्याची सांगता होणार आहे. या सोहळा ह भ प गुरूवर्य राम महाराज झिंजुर्के (श्री जोग महाराज संस्थान ,आखेगाव )यांच्या अधिपत्याखाली ५०० टाळकऱ्यांचा उपस्थितीमध्ये पार पडणार असून या काळात दररोज सायंकाळी ७ ते या वेळात नामांकित




ह भ प केशव महाराज नामदास , ह भ प तुकाराम महाराज जेउरकर , ह भ प पांडुरंग महाराज घुले , ह भ प ज्ञानेश्वर महाराज कदम, ह भ प रामराव महाराज ढोक, ह भ प उद्धव महाराज मडलिक यांची तर दररोज सकाळी १० ते १२ या वेळात ह भ प शब्दप्रमी संग्राम बापू भंडारे व शुक्रवार दि.१५ ऑगस्ट रोजी भगवान श्री कृष्ण व ज्ञानेश्वर माऊली जन्मोत्सव निमित्त रात्री १० ते १२ ह भ प राम महाराज झिंजुर्के यांची तर शनिवार दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी १०ते १२ या वेळात भगवान गडाचे न्यायाच्यार्य महंत डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांचे अमृत काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाच्या कार्यक्रमाने सांगता होणार आहे दरम्यान याच काळात दररोज दुपारी २ ते ५ या वेळात श्रीकृष्ण लीलामृत कथा पार पाडणार असून ह भ प गुरूवर्य ज्ञानेश्वर माऊली शिंदे यांच्या गोड वाणीतून कथा संपन्न होणार असून दररोज रात्री ९ ते ११ या दरम्यान विविध महाराजांची संगीत भजन सेवा पार पडणार असून शुक्रवार दि.१५ ऑगस्ट रोजी प्रा. राजेश सरकटे यांचा गजर विठ्ठलाचा हे भक्ती संगीत होणार आहे. सदरचा कार्यक्रम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार तळासह ५ एकराच्या जागेत होणार असल्याचेही या वेळी आयोजकांनी व ग्रामस्थानी सांगितले आहे .

# संजय छल्लाणी यांना पितृशोक - ज्येष्ठ वैद्यकीय सेवक डॉ. इंदरचंदजी छल्लाणी यांचे निधन

डॉ आशिष तिवारी /मंठा

मंठा येथील ज्येष्ठ आणि प्रतिष्ठित वैद्यकीय सेवक, समाजसेवक डॉ. इंदरचंदजी भवरीलालजी छल्लाणी (वय ९०) यांचे दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी दुपारी ४:३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.ते प्रसिद्ध व्यापारी व महावीर जिनिंगचे संचालक तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती मंठा येथील माजी सभापती संजय इंदरचंदजी छल्लाणी यांचे वडील होते.डॉ. छल्लाणी यांनी मागील सुमारे सहा दशकांहून अधिक काळ मंठा शहरात वैद्यकीय सेवा केली. त्यांच्या हातून हजारो रुग्ण बरे झाले असून, त्यांनी सेवा हाच धर्म मानून वैद्यकीय पेशाला समाजसेवेची जोड दिली.ते अत्यंत शांत, विनम्र, मनमिळावू, धार्मिक व अध्यात्मिक स्वभावाचे होते. त्यांच्या सामाजिक जाणिवा, कुटुंबवत्सल वृत्ती व सेवाभावामुळे ते परिसरात अत्यंत आदराने पाहिले जात होते. दुर्दैवाची बाब म्हणजे दिनांक २४ जुलै २०२५ रोजी त्यांच्या धर्मपत्नी सरलाबाई इंदरचंदजी छल्लाणी यांचे आकस्मिक निधन झाले होते. ह्या दोन्ही निधनाच्या दुःखद



घटनांमुळे मंठा शहरात व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, दोन मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांच्यावर मंठा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीसाठी सामाजिक, वैद्यकीय, राजकीय, धार्मिक व अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.सर्व स्तरातून डॉ. छल्लाणी यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.